# MT

Seat No. | | | | | | | |

**2018 .... .... 1100**

**MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - II**

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

उ.१ **अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| ताडोबा → | अंधारी व्याघ्र प्रकल्प | ½ |
| तारीख → | २७ मे १९९७ | ½ |
| परिक्षेत्र → | कोळसा | ½ |
| वेळ → | सकाळी ६ ते ९.३० | ½ |

(२) (i) **सकारण लिहा.** 1

बिबळ्यानं अद्याप लेखकाला पाहिलं नव्हतं, कारण **लेखकाकडे त्याची पाठ होती.**

(ii) कोणती चांगली संधी हातची गेली म्हणून लेखक हळहळला ? 1

(३) **व्याकरण :**

(i) **योग्य उभयान्वयी अव्यय वापरून खालील रिकामी जागा भरा.** 1

तो रस्ता धरला **आणि** जंगल आणखीच दाट झाल्यासारखं वाटलं.

(ii) **तक्ता पूर्ण करा.** 1

| शब्द | प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|
| (i) डोळ्यांना | ना | द्वितीया (अनेकवचन) किंवा चतुर्थी (अनेकवचन) |

(४) **स्वमत :** 2

मी इयत्ता ८ वीत असताना नाताळाच्या सुट्टीत जंगल सफारीचा अनुभव घेतला आहे. कोचीन, पेरीयार व टेकाडी या केरळाच्या टूरवर असताना. टेकाडीच्या घनदाट जंगलात हत्तीवरून जंगल सफारीची मजा लुटली. हत्तीवर बसण्याचा, संथपणे हेलकावे घेत जाण्याचा अनुभव निराळाच होता. आम्ही चारजण हत्तीवर बसून जंगल फिरलो. हरणांचे कळप दिसले. रानम्हशी दिसल्या. रानगव्यांचा

कळप जाताना आमच्या गाईडने दाखवला. मुंग्यांची मोठ-मोठी वारूळे दिसली. मधमाश्यांचे पोळे पाहिले. वाघही पहायला मिळाला. खूप दूरवर असल्याने वाघाची अंधूकशी झलक दिसली. कोल्हे तर दोन-तीन वेळा दिसले. बहिरी ससाणेही दिसले.

आम्ही रस्त्यावरून मुंगूस जाताना पाहिले. त्याची मोठी तुरेदार शेपटी शोभून दिसत होती. सांबरशिंग काळ्या कभिन्न रंगाचे होते. त्याची शिंगे मोठी डौलदार होती. हत्तींचा कळप टेकडीच्या नदीवर पाणी प्यायला आला होता. हत्तींची दोन पिल्ले फारच मोहक होती. पक्ष्यांचा किलबिलाट होता. दाट जंगलातून जाताना पानांची सळसळ ऐकू येत होती. झाडांच्या फांद्या अक्षरश: आमच्या अंगाखांद्याला लागत होत्या. हत्तीवर असल्याने कोणत्याही वन्यप्राण्यापासून आम्हाला धोका नव्हता. दिवस कसा संपला हे कळलेही नाही. जंगलातील अनुभवांचे गाठोडे घेऊन आम्ही परतलो.

उ.१ **आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 2




(२) **(i) एका वाक्यात उत्तर लिहा.** 1

वडिलांची बदली वडगावला झाली.

**(ii) कारण लिहा.** 1

लेखकाचे वडील त्या वेळेस पोलीस खात्यामध्ये तुटपुंज्या पगारावर नोकरी करत होते. त्यामुळे घरखर्च भागवताना फार त्रास होत असे म्हणून पैशाअभावी ते मुलांना खेळणी विकत घेऊ शकत नव्हते.

(३) **व्याकरण :**

**(i) खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा.** 1

सर्वनाम - माझ्या

**(ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.** 1

(i) गरीब × श्रीमंत (ii) दु:ख × सुख

(४) **स्वमत :** 2

प्रत्येक आईवडिलांची इच्छा असते की आपले मूल मोठे व्हावे, आपले व आपल्या घराण्याचे नाव त्याने उज्ज्वल करावे. मुलांच्या नावाने आपण ओळखले जावे. प्रत्येक पालकांची ही एकच इच्छा असते की, आपल्या मुलांची उत्तरोत्तर प्रगती व्हावी, त्याची प्रसिद्धी व्हावी. त्याप्रमाणेच लेखकांच्या आई-वडिलांचीही लेखक व त्यांचे भाऊ मोठे व्हावे, मोठे ऑफिसर व्हावे, आपले नाव उज्ज्वल करावे ही इच्छा होती. लेखकांच्या वडिलांची बदली वडगावला झाल्यामुळे शिक्षणासाठी त्यांना काकांकडे पुण्यातच ठेवण्यात आले. आपल्या मुलांना सोडून राहणे आईवडिलांना दु:खदायक वाटत होते; परंतु त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मन घट्ट करून लेखकाच्या आईवडिलांनी निरोप घेतला असेल असे मला वाटते.

**अपठित गद्य**

उ.१ **इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 2

- मनुष्य → **चांगले काम** → स्वर्गात
- मनुष्य → **वाईट कृत्ये** → नरकात

(२) **उत्तरे लिहा.**

(i) चांगल्या किंवा वाईट कृतीची बीजे आपल्या विचारात म्हणजेच मनात असतात. 1

(ii) आपले मन स्वर्गाचे किंवा नरकाचे स्थान आहे. 1

(३) **व्याकरण :**

(i) **समानार्थी शब्द लिहा.** 1

(अ) हात – कर (आ) बीज – बी

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** 1

(अ) स्वर्ग × नरक (आ) अलीकडे × पलीकडे

(४) **स्वमत :** 2

स्वर्ग आणि नरक म्हणजे माणसाने स्वत:च्या मनाची काढलेली समजूत वाटते. तसे पाहायला गेले तर स्वर्ग व नरक अशा काही गोष्टी या विश्वाच्या पसाऱ्यात कोठे आहेत, हे अजूनपर्यंत सिद्ध झाले नाही. माणसाने चांगल्या गोष्टी कराव्यात यासाठी स्वर्गाची संकल्पना करण्यात आली असावी व त्याच्याकडून वाईट कृत्य घडू नये म्हणून नरकाची संकल्पना तयार झाली असावी. नाहीतर आजच्या वैज्ञानिक युगात कधीतरी कोणालातरी स्वर्ग व नरक या जागा सापडल्याच असत्या. या सृष्टीच्या पसाऱ्यात स्वर्ग आणि नरक असो अथवा नसो; पण प्रत्येक व्यक्तीने ते आहेतच असे समजून काम करावे. म्हणजे आपल्याकडून वाईट कृत्ये घडणार नाहीत.

| | | |
|---|---|---|
| | **विभाग २ – पद्य** | |
| उ.२ (१) | **(अ) खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**<br>**आकृतिबंध पूर्ण करा.**<br>(i) **डोळे भरून पाहायची आहे** → विजयाची दौड | 1 |
| | (ii) **ज्योत ज्योत पाजळावी** → डोळ्यांतील आसवांची | 1 |
| (२) | (i) **खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.**<br>जवानाची विजयाची दौड हे डोळे भरून पहावे असे दृश्य आहे. | 1 |
| | (ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.**<br>तुझ्या शौर्यगाथेपुढे त्याची केवढीशी **शान.** | 1 |
| (३) | 'औक्षण' या कवितेत दीनदुबळे याचा मार्मिक अर्थ कवयित्री इंदिरा संत यांनी सांगितला आहे. आम्हा भारतीयांचे आपल्या भारत देशावर अत्यंत प्रेम आहे. आमच्यापैकी काहीजण असेही आहेत की, ज्यांच्याकडे पैसा - अडका, संपत्ती कदाचित नसेलही, तसेच त्यांच्या शिरेमध्ये सळसळणारे रक्तही नसेल, पण तरीही सीमेवर लढाईसाठी जाणाऱ्या जवानांबद्दल त्यांच्या प्रत्येकाच्या मनात अभिमान आहे. लढाईसाठी जाणाऱ्या सैनिकांचे आपल्या डोळ्यांतील ज्योतींनी ते औक्षण करत आहेत. आम्ही सारे दीनदुबळे भारतीय लोक तुझे असे औक्षण करत आहेत. येथे दीनदुबळे म्हणजे कमजोर किंवा पैसे नसलेले गरीब असा अर्थ नसून 'दीनदुबळे' म्हणजे 'सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारी जनता' असा अर्थ कवयित्रीला अभिप्रेत आहे. | 2 |
| (४) | देश हाच देव समजून सैनिक देशाची सेवा करीत असतात. त्यांचे हे काम अतुलनीय आहे. अनेक महिने ते आपले घरदार, कुटुंब सोडून सीमेवर लढत असतात. ऊन, थंडी, पावसाची तमा न बाळगता देशासाठी प्राण अर्पण करायला तयार होतात. अशा वेळेस आम्ही त्यांच्या या गुणांचे कौतुक भेटकार्ड देऊन करु शकतो. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी त्यांना शुभेच्छा कार्ड पाठवू शकतो. रक्षाबंधनच्या दिवशी त्यांना राखी पाठवू शकतो. मकर संक्रांतीला सीमेवरच्या जवानांसाठी तीळगुळ पाठवून स्नेह प्रदर्शित करू शकतो. त्यांच्या शहरातील वा गावातील कुटुंबाकडे स्थळभेट देऊन त्यांच्या कुटुंबाची ख्याली खुशाली विचारु शकतो, त्यांच्याशी प्रेमाचे अतुट नाते जोडू शकतो. | 2 |

उ.२ **आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 1

**नव्या पिढीचे, नव्या युगाचे करू साकार** → स्वप्न

(२) **चौकट पूर्ण करा.** 1

फुलामुलांतून हसणारा - श्रावण

(२) (i) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

__**आभाळावर**__ उत्क्रांतीचा घुमवू या ललकार ।।

(ii) **ओघतक्ता पूर्ण करा.** 1

**जपू वाढवू** → विश्वाची संपदा → **उज्ज्वल करू** → देशाचे भविष्य

(३) ‘स्वप्न करू साकार’ कवितेत श्री किशोर पाठक यांनी देशाच्या उज्जवल भविष्याचे स्वप्न रंगविले आहे. देशात नव्या पिढीचे आगमन होत आहे. नवे युग चालू आहे तेव्हा नवीन कल्पना, नवी उमेद आहे. कवीला देशाच्या मातीतून मोती पिकवायचे आहेत. भरघोस धान्याचे पिक घ्यायचे आहे. मातीचा कस सुधारायचा आहे. श्रावणसरींनी हसणाऱ्या, फुलणाऱ्या फुलांना व मुलांना पहायचे आहे. श्रमप्रतिष्ठेवर भर देऊन प्रयत्नांची कास धरायची आहे. औद्यौगिक प्रगती करायची आहे. एकोप्याने देशाची वैभव संपदा केवळ जपायचीच नाही तर वाढवायची आहे. नव्या पिढीला श्रमशक्ती, यंत्र यांचा मंत्र द्यायचा आहे. देशासाठी झटणारे शुभंकर, कल्याणकारी हात तयार करायचे आहेत. देशाचे नाव उज्ज्वल करून सगळ्या जगात आपल्या देशाचा नावलौकिक वाढवायचा आहे. 2

(४) ‘स्वप्न करू साकार’ या कवितेत श्री. किशोर पाठक यांनी ‘एकजूटीचे सामर्थ्य’ हे मूल्य मनात रूजविण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे. कोणतेही काम एकट्याने करून पूर्ण होत नाही. घरी तयार होणाऱ्या अन्नपदार्थांसाठी अगदी शेतकरी दादापासून, दुकानदार, कामगार, वाहतूक या सर्व घटकांची मदत आवश्यक असते. तसेच देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी एकजूटीने काम करणे तितकेच महत्त्वाचे आहे. 2

'हजार आम्ही एकी बळकट, सर्वांचे हो एकच मनगट' या पंक्तीवरून सिद्ध होते की, देशाची जनता एकत्र आली तर मनगटात बळकटी येईल व प्रगती शक्य होईल. सर्वांची शक्ती पणाला लावून कृषी व उद्योग यामध्ये उत्क्रांती होईल. या मातीवर जसा सर्वांचा अधिकार आहे, तसाच सर्वांनी मिळून मिसळूनच नव्या युगाचे स्वप्न साकारायचे आहे. भारताची संस्कृती व परंपरा थोर आहे, पण ती जपून वाढवायची आहे. हे एकजूटीने साध्य होणार आहे. साऱ्या विश्वात एकजुटीने भारताचा जयजयकार करायचा आहे.

उ.२ (१) **इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** 4

'रंग मजेचे रंग उदयाचे' ही कविता कवयित्री 'अंजली कुलकर्णी' यांनी लिहिली आहे. पर्यावरणाची जोपासना केली तर माणसाला कधीच काही कमी पडणार नाही, असा विचार कवयित्रीने मांडला आहे.

कवयित्री म्हणते, आजचे युग कितीही आधुनिक झाले, तंत्रज्ञान विकसित झाले तरी निसर्ग तुमचा खरा मित्र आहे. तुमचा पोषणकर्ता आहे. कारण तंत्रज्ञानाच्या विकासामुळे संगणकाची निर्मिती झाली. पण हा संगणक तुम्हांला धान्य देऊन तुमचे पोषण करू शकत नाही. तर काळी आई म्हणजेच धरतीमाता आपण जगवली तरच आपण जगू शकतो. तीच खरी आपले पोषण करणारी जननी आहे. तिलाच आपण जगवूया असे कवयित्री सांगते. या काळ्या मातीमध्ये जे हात खऱ्या अर्थाने राबतात, कष्ट करतात आणि तिचे संगोपन करतात अशा शेतकऱ्याचे, भूमिपुत्राचे सुद्धा आपण संरक्षण केले पाहिजे त्यांच्या कष्टांना पाठबळ, दुजोरा दिला पाहिजे. तरच आपल्याला उद्याच्या उज्ज्वल भविष्याचे रंग व जीवनातील मजेचे रंग पाहायला मिळतील आणि ही धरती खऱ्या अर्थाने सुजलाम् सुफलाम् होऊन इथला मनुष्यप्राणी सुखी होईल.

मातीस काळ्या आईचे रुपक दिले आहे. संगणकाच्या मर्यादा सांगून आशयसौंदर्य निर्माण केले आहे. श्रमप्रतिष्ठा व त्यास पुष्टी देऊन काव्यसौंदर्य खुलवले आहे.

## विभाग ३ – स्थूलवाचन

उ.३. (१) **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** 3

वाळवंटी प्रदेशात वर्षातून एखादाच पाऊस पडतो. कधी तर दोनदोन,तीन-तीन वर्षे पावसाचा ठिकाणा नसतो, एरवी तेथे वाळवंटात सूर्य आग ओकत असतो. हवा तापलेली असते. सूर्याच्या आगीमध्ये पाने, फुले, गवत करपून जातात. वाळवंटात ओसाड, भकास जीवन असते. पण पावसाची वाट पहात बियांच्या रूपाने मातीत पडून रहायचे हा कॅक्टसचा गुणधर्म असतो. कॅक्टस अवर्षणाचा प्रतिकार करणारा आहे. जे काही पाणी मिळेल तेवढे स्वत:मध्ये साठवून घ्यायचे आणि कोरड्या हंगामात अगदी मंद गतीने वाढत रहायचे. अशी कॅक्टसची जगण्याची किमया असते. सग्वारो कॅक्टस तर २०० वर्षे जगतो. कॅक्टसमध्ये पाणी साठवण्याची रचना असते. मिळेल तेवढे पाणी तो साठवतो. त्याची सगळी अंगरचना पाणी साठवण्यासाठी बनलेली असते. पाऊस पडतो तेव्हा वाळवंटाची जमीन फारच थोडे पाणी शोषून घेते. त्यामुळे थोड्यावेळात पुष्कळ पाणी शोषून घेता येईल अशी कॅक्टसच्या मुळांची खास रचना असते. आपली मुळे लांब पसरवून भोवतालच्या जास्तीत जास्त क्षेत्रातील पाणी तो शोषून घेतो. झाडातले बरेचसे पाणी त्यांची पाने बाष्पीभवनाने गमावतात म्हणून कॅक्टसच्या झाडाने पान ही गोष्टच काढून टाकली आहे. म्हणूनच म्हटले आहे 'थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस!'.

(२) **खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा.** 3

१९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे' असा ठराव संमेलनात मंजूर करण्यात आला. सर्वांच्या मतानुसार हे कार्य कृ.पा.कुलकर्णी यांच्यावर सोपविण्यात आले. बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोश निर्मितीस भरीव मदत झाली. तसेच सर्वांच्या सहकार्यामुळे १९४६ साली 'मराठी व्युत्पत्ती कोशाचे' पहिले प्रकाशन झाले.

(२) **टिपा लिहा.** 3

सग्वारो कॅक्टस वाळवंटी प्रदेशाचा अगदी खास प्रतिनिधी आहे. कॅक्टसच्या अनेक जातींमध्ये सग्वारो हा कॅक्टसचा राजा मानला जातो. तो ५० फूट उंचीपर्यंत वाढतो. त्याची वाढ मंद असते इतकी, की ५० वर्षात तो फक्त ३ फूट वाढतो आणि २०० वर्षे जगतो. सग्वारो कॅक्टसची फुले गेंदेदार असतात ही फुले फुलली की थोडा काळ तरी ओसाड वाळवंट सौंदर्यपूर्ण होते. सग्वारो कॅक्टसला फळे येतात. त्यातील गर कलिंगडासारखा असतो. सग्वारो कॅक्टस हात वर करून उभ्या राहिलेल्या एखाद्या मोठ्या बाहुल्यासारखा दिसतो.

सग्वारो कॅक्टसचा उपयोग अमेरिकेतील रेड इंडियन करीत असत. अवर्षणाच्या काळात कॅक्टस चेचून ते त्याचे पाणी काढत आणि तहान शमवण्यासाठी हे पाणी पीत. सग्वारो कॅक्टसची फळे ही कलिंगडाच्या गरासारखी असल्याने खाण्यासाठी उपयोग होतो. फळाच्या गरात साखर घालून तो मोरावळ्यासारखा टिकवता येतो. रेड इंडियन लोकांचे हे ही एक खाद्य असते.

## विभाग ४ – भाषाभ्यास

उ.४ **(अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** 2

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | **गल्लोगल्ली** | प्रत्येक गल्ली | अव्ययीभाव समास |
| (ii) | **मायलेक** | माय आणि लेक | इतरेतर द्वंद्व समास |

(ii) **अलंकार** 2

'यमक' अलंकाराची दोन उदाहरणे द्या.

१. ऐसा आनंद सोहळा । निर्मळा । पाहे आपुले डोळां ।।
आनंद न माय गगनी । वैष्णव नाचती रंगणी ।।

२. अग्निमाजी पडे बाळू । माता धावे कनवाळू ।।
तैसा धावे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा ।।

(iii) **वाक्यरूपांतर**

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. अब्दुल बसस्टॉपवर ये. 1

२. तपोवनाकडे कोणी कशालाही जात नाही. 1

(iv) **सामान्यरूप** 2

**दिलेल्या शब्दांचे मूळशब्द व सामान्यरूप असे वर्गीकरण करा.**

| क्र. | दिलेला शब्द | मूळशब्द | सामान्यरूप |
|---|---|---|---|
| (१) | **तुरूंगात** | तुरूंगा | तुरूंग |
| (२) | **समारंभांना** | समारंभ | समारंभां |

(v) **वाक्प्रचार**

**खालील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. बाहेर कामाशिवाय जायचे नाही, अशी वडिलांनी मला **सक्त ताकीद दिली.** 1

२. मुलांनी वाईट पदार्थ **वर्ज्य केले पाहिजेत.** 1

उ.४ **(ब) स्वाध्यायावर आधारित कृती.**

(१) **शब्दसंपत्ती** 1

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. आशय - अर्थ, मतीतार्थ २. परिचय - ओळख

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** 1

१. नकारार्थी × होकारार्थी २. खासगी × सार्वजनिक

(iii) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** 1

जेथे दोन नद्या एकत्र येऊन मिळतात - संगम

(iv) **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.** 1

मृत्यू ← काळ → वेळ

(२) **लेखननियमांनुसार लेखन**

(i) **अचूक शब्द ओळखून लिहा.** 1

१. वडिलांसोबत २. तालमीला

(ii) **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** 1

**रेखामावशी** सगळ्यांचं बोलणं **लक्ष** देऊन ऐकत होत्या.

(३) **विरामचिन्हे**

**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. वा! सर्व ताई-दादांनी मला कित्ती माहिती दिली. आता हा कोणता दादा बरं? 1

२. कित्ती सुंदर! आता ही ताई कोण बरं? 1

(४) **पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.**

१. Footprints - पाऊलखुणा ½

२. Computer - संगणक ½

(५) **भाषिक खेळ**

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** 1

दंभ, मोह, राग, लोभ

**विभाग ५ – उपयोजित लेखन**

उ.५ **अ. खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन** 5

(i) दि. ५ सप्टेंबर, २०१८

प्रति,
मा. विभागीय अधिकारी,
मुंबई महानगरपालिका,
मुंबई.

विषय – शाळेसमोरील रस्ता नादुरुस्त असल्याकारणाने तक्रार पत्र.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार.

मी अ. ब. क., एक त्रस्त पालक आपणास पत्र लिहीत आहे. माझा मुलगा ज्ञानदीप विद्यालयात इयत्ता ३ री मध्ये शिकतो. या शाळेसमोरील रस्ता गेले दोन महिने अतिशय खराब स्थितीत आहे. बऱ्याच वेळा तक्रार करूनही त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष दिले जात नाही. आता ऐन पावसाळ्याचे दिवस आहेत. रस्त्यावरील खड्ड्यात बरेच पाणी साचत आहे. त्यामुळे रस्त्यावर चालणेच त्रासाचे आहे.

येथे वाहनांची कोंडी होत आहे. विशेष करून शाळा सुटण्याच्या वेळेस फारच गर्दी होते. शिवाय खड्ड्यात पाणी तसेच साचून राहिल्याने तेथे कचरा, घाण जमा होऊन दुर्गंधी व मच्छर यांचा त्रास वाढला आहे. रहदारीची कोंडी झाल्यामुळे सतत गाड्यांचे हॉर्न वाजत असतात.

तरी कृपया या तक्रारीकडे आपण वैयक्तिक लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला नम्र,
अ. ब. क.
१०१, पारिजातक,
ला. ब. शास्त्री मार्ग,
भांडूप (पूर्व).

| | | |
|---|---|---|
| (ii) | दि. ५ जानेवारी, २०१८<br>प्रति,<br>मा. विभागीय अधिकारी,<br>आरोग्य विभाग,<br>मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई.<br>**विषय –** मच्छर प्रतिबंधक योजना राबविण्यासाठी विनंती पत्र.<br>माननीय महोदय,<br>सप्रेम नमस्कार.<br>मी अ. ब. क., संजीवनी निवास, मुलुंड (प). या विभागात राहत असून मच्छर प्रतिबंधक योजना राबविण्यासाठी विनंती पत्र लिहीत आहे.<br>पावसाळा संपून काही आठवडे झाले आहेत. त्यामुळे सर्वत्र खाचखळग्यांत पाणी साचून राहिले आहे. तसेच नाल्यातही पाणी साचून राहिले आहे. या साचलेल्या पाण्यामुळे मच्छरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे मलेरिया, डेंग्यू यांसारखे गंभीर आजार पसरण्याची शक्यता आहे.<br>आमच्या विभागात लहान मुलांची संख्या जास्त आहे. आपण कृपया या तक्रारीची नोंद घेऊन त्वरीत मच्छर प्रतिबंधक योजना राबवावी, यावी, ही एक पालक म्हणून आपणास नम्र विनंती.<br>कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.<br>आपला विश्वासू,<br>अ. ब. क.<br>संजीवनी निवास,<br>मुलुंड (प.),<br>मुंबई. | 5 |
| (२) | **सारांश लेखन**<br>**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**<br>माणसाचे जीवन म्हणजे अनुभवाची साखळी असते. जन्माला आल्यापासून शारीरिक बौद्धिक तसेच भावनिक अनुभव माणसाला मिळत असतात. काही अनुभव हे नैसर्गिक तर काही अनुभव हे कृत्रिम म्हणजेच जिज्ञासेतून आलेले असतात. या अनेक अनुभवातूनच माणसाचे व्यक्तिमत्त्व घडत जाते. अनुभवातूनच चांगल्या वाईटाची जाणीव माणसाला होते. अनुभवातूनच शिकून माणूस आपले व्यक्तिमत्त्व समतोल राखण्याचा प्रयत्न करतो. | 5 |
| उ.५ | **आ. खालील कृती सोडवा.** | |
| (१) | **बातमी लेखन**<br>**खालील विषयावर बातमी तयार करा:**<br>**आमच्या वार्ताहराकडून** **दिनांक ६ सप्टेंबर**<br>**शिक्षकदिनाचा उत्साह**<br>**सावंतवाडी -** येथील वासुदेव बळवंत फडके विद्यालयात काल 'डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन' यांच्या स्मरणार्थ शिक्षकदिन मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा करून विद्यार्थ्यांनी डॉ. राधाकृष्णन व | 6 |

आपल्या शिक्षकांविषयी आदर आणि कृतज्ञताभाव व्यक्त केला. याप्रसंगी शाळेचे उपमुख्याध्यापक श्री. नाईक सरांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यादिवशी शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी शिक्षक होऊन दोन्ही सत्रात उत्तम प्रकारे शाळा चालवली. शिक्षकांनी शिक्षकदिनाच्या दिवशी शिकवण्याचे तास न घेता आपल्या विद्यार्थी शिक्षकांच्या कामाचे अवलोकन केले.

सर्व विद्यार्थ्यांच्या उत्साह व आनंदाला उधाण आले होते. नवीन शिक्षक त्यांना न रागावता व ओरडता शिकवत होते. मुलेही मनात येणारे कोणतेही प्रश्न विचारून नव्या शिक्षकांच्या ज्ञानाची व संयमाची परीक्षा घेत होती. मुख्याध्यापकांपासून शिपायांपर्यंत सर्व कामे विद्यार्थ्यांनीच केली. शाळेच्या भव्य सभागृहात शिक्षक व विद्यार्थी एकत्र जमले. आजच्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाचे सादरीकरण व सूत्रसंचालनही विद्यार्थी-शिक्षकांनीच केले. मुख्याध्यापक व इतर शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा गुणगौरव करणारी भाषणे केली. शाळेच्या मुख्याध्यापकांच्या हस्ते डॉ. राधाकृष्णन यांना पुष्पमाला अर्पण केल्यानंतर सर्व उपस्थित शिक्षकांना गुलाबपुष्प देऊन गौरवण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व शिक्षकांनीही सर्व विद्यार्थी-शिक्षकाचे तोंड भरून कौतुक केले. यशवंत व्हा, गुणवंत व्हा आणि उत्तम अभ्यास करून सफल व्हा! असा मोलाचा सल्लाही दिला. विद्यार्थी-शिक्षक व शिक्षक यांच्या एकत्रित चहा-फराळाच्या कार्यक्रमाने या उपक्रमाची सांगता झाली.

(२) **कथा लेखन** 6

**खाली दिलेल्या मुद्द्यांवरून कथा तयार करा. कथेला योग्य शीर्षक द्या.**

**करावे तसे भरावे**

साताऱ्याजवळ पाटण तालुक्यात घडलेली गोष्ट. या गावात जयसिंगराव पाटील नावाचे श्रीमंत उद्योगपती राहत होते. त्यांचे वय बरेच झाले होते. खूप मेहनत करून त्यांनी अमाप संपत्ती जमा केली होती. त्यांच्याकडे दोन नोकर होते.

जयसिंगरावांकडे एक कोंबडा होता. तो कोंबडा आरवला की ते उठत आणि नोकरांना उठवून काम करायला सांगत. दोन्ही नोकर अतिशय आळशी होते. पहाटे लवकर उठणाऱ्या कोंबड्याचा त्यांना अतिशय राग होता. पण करणार काय? मालकाची आज्ञा त्यांना पाळावीच लागे. या कोंबड्यालाच मारून टाकले तर पहाटे उठण्याचा त्रास तरी वाचेल असे त्यांना वाटले. पण मालकापुढे त्यांचे काहीच चालेना. त्यामुळे ते मालक घरात नसण्याच्या संधीची वाट पाहू लागले.

नोकर ज्या संधीची अगदी आतुरतेने वाट पाहत होते. ती वेळ आता जवळ आली होती. एके दिवशी जयसिंगराव काही कामानिमित्त पुण्याला गेले. दोन्ही नोकरांनी या सुवर्णसंधीचा फायदा घेतला आणि कोंबड्याला मारून टाकले.

जयसिंगराव परत आल्यानंतर त्यांना आपला कोंबडा कुठेच दिसला नाही. ते बेचैन झाले. त्यांना चिंता लागली की, आता आपल्याला पहाटे कोण उठवणार? त्या चिंतेत त्यांना रात्री झोपही लागेना, त्यामुळे ते वेळी अवेळी उठत आणि नोकरांनाही उठवत आणि काम करायला लावत. कोंबडा असताना निदान ते पहाटे पाच वाजता तरी उठत, पण आता तर कधी दोन वाजता तर कधी तीन वाजताही जयसिंगराव उठत व नोकरांनाही उठवत. त्यामुळे नोकरांना पहिल्यापेक्षा जास्त काम करावे लागे. आता मात्र त्यांना आपल्या कृत्याचा खूप पश्चात्ताप झाला होता.

उ.५ **इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** 8

(१) **मी पक्षी झालो तर ...**

साडेसात वाजले होते. शाळेत जाण्यासाठी अर्ध्यातासापासून मी बसच्या रांगेत उभा होतो. पण बसचा पत्ता नव्हता. शाळेची वेळ झाली होती. काय करावे सुचत नव्हते. सरांचा रागीट चेहरा समोर येत होता. त्यांच्या हातातली छडी दिसत होती व त्यांची बोलणीही खावी लागणार होती. शाळा दूर असल्याने चालत अथवा धावत जाणेही मला शक्य नव्हते. चुळबूळ करीत अस्वस्थ मनाने बसची वाट पाहणे एवढेच माझ्या हातात होते. तोच शेजारच्या माणसाच्या हातातील मोबाईलवर गाणे वाजले होते, 'पंख होते तो उड आती रे!' समोरून त्याचवेळी दोन चिमण्या उडून जातांना दिसल्या. मनात कल्पना सुचली, 'मी पक्षी झालो तर......' मी विचारांच्या हवेवर उडू लागलो......

लहानपणी आईने मला अनेक छान-छान गोष्टी सांगितल्याचे आठवले. मला परीच्या गोष्टी ऐकायला खूप आवडत. परीला पंख असल्याने ती कोठेही जाऊ शकत होती. पंख असल्याने तिला उडता येत असे. आई एक कविता म्हणत असे. त्यातली एक ओळ आजही आठवते. 'कावळा म्हणतो पंख दे, चिमणी म्हणते खोपा दे' मला कावळ्याचे मागणे आवडे. खरंच, रस्त्यावरची गर्दी, रहदारी, बसचा विलंब पाहून वाटतं मला पंख असते तर....

खरोखर मी पक्षी असतो तर भुर्रकन उडून सर्वांच्या आधी शाळेत आलो असतो. ना बसची रांग, ना बसची सुट्ट्या पैशांची रोजची कटकट. रोज मी उडत उडत शाळेबरोबरच मित्रांकडे, आजी आजोबांकडे गेलो असतो. ना प्रवासाचा खर्च ना रहदारीचा त्रास. आले मनात की निघालो प्रवासाला. मी स्वातंत्र्याचा पूर्ण आनंद उपभोगला असता. सहलीला जाण्यासाठी नको आई बाबांची मनधरणी, नको त्यांचे पैसे, ना त्यांच्या अटी ऐकणे.

खूप मस्तपैकी गगन विहाराचा आनंद घेतला असता. आकाशात उंचच, उंच भराऱ्या मारल्या असत्या. भूक लागल्यावर ताजी-ताजी फळे खाल्ली असती. तहान लागताच नदी, तलवाचं शुद्ध वाहतं पाणी प्यायलो असतो. इतर पक्ष्यांबरोबर उंच उंच उडण्याच्या स्पर्धा लावल्या असत्या. पक्षी झाल्यावर रेल्वे, बस, विमान किंवा कोणत्याही वाहनाने कधी प्रवास केलाच नसता. नको तिकीट, नको पासपोर्ट, नको व्हिसा, नको पैसे, फक्त प्रवास आनंदाचा, सुखाचा, स्वातंत्र्याचा! ना रांगेचा त्रास, ना अपघाताचं भय! पक्षी होऊन गगन विहाराचा मनसोक्त आनंद उपभोगला असता.

आपल्या भारत देशात अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. ज्यांच्या बद्दल ऐकले व वाचले आहे, ती स्थळे पाहाण्याची हौस पुरी केली असती. पक्षी झाल्याने निसर्ग, हिरवी झाडे, ताजी फळे, नद्या, तलाव यांचे सानिध्य लाभले असते.

पण, हे काय! त्या मुलाच्या हातात दगड. तो बहुधा मला मारण्यासाठीच त्याने उचलला आहे. हे मुला, मला दगड मारायचा नाही, दगड मारु नको. पण तो कुठे ऐकतो. अरे बापरे! माझी भाषा त्याला कशी कळणार ? मी पक्षी आहे नां ? नाही मला पक्षी होऊन मार नाही खायचा, पिंजऱ्यात नाही अडकायचं. मी पक्षी नाही, ओरडत असतानाच बस आली व मी शाळेकडे निघालो.

(२) **झाडाचे आत्मवृत्त** 8

एकेकाळी या माळरानावर असंख्य डेरेदार वृक्ष होते. माझेच वय आता शंभर वर्षांपेक्षा अधिक आहे. शेजारच्या गावातील एका शेतकऱ्याने माझे रोपटे लावले. तोच माझा जन्म. माझी काळजी घेतली. मला खत-पाणी घातले. ऊन, वाऱ्यापासून माझे रक्षण केले. हळूहळू मी जोमाने वाढू लागलो. काही वर्षातच माझे एका सुंदर हिरव्यागार अशा वृक्षात रूपांतर झाले. मला माझ्याच रूपाचा हेवा वाटू लागला. विविध प्रकारचे पक्षी माझ्या अंगाखांद्यावर खेळू लागले, बसू लागले. माझी गोड फळे चाखू लागले. आनंदाने गाऊ लागले. काहींनी तर घरटीही बांधली. शेतात काम करून थकलेले शेतकरी विसाव्यासाठी माझ्याच सावलीत बसू लागले. ऊन-पावसापासून रक्षण करण्यासाठी वाटसरू, गाई-वासरू माझ्या आसऱ्याला येऊ लागले हे असे अनेक वर्षे चालू होते.

पण अचानक सारे बदलले आजूबाजूच्या गावातील वस्ती वाढू लागली. घरे बांधण्यासाठी, फर्निचरसाठी, इंधनासाठी माणसे वृक्षतोड करू लागली. स्वत:च्या स्वार्थासाठी आम्हांला ओरबाडू लागली. एकेकाळी हिरवागार दिसणारा हा परिसर उजाड माळरान बनला. मानवाची ही स्वार्थी वृत्ती बघून मला खूप दु:ख होते. अतिशय निरपेक्ष मनाने आम्ही तुम्हाला सर्वस्व देतो. पण त्या मोबदल्यात मानवाकडून आम्हाला आज अशी वागणूक मिळते. विकासाच्या नावाखाली बेसुमार जंगलतोड होत आहे. जमिनीची धूप होत आहे. प्रदूषण वाढते आहे.

हल्ली सर्वत्र ग्लोबल वॉर्मिंगची चर्चा होत आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीवरचे तापमान वाढत आहे. बर्फ वितळू लागला आहे. वन्य जीवन संकटात येऊ लागले आहे. हे सर्व कशामुळे तर तुम्हा मानवाने आमच्यावर निर्दयपणे चालविलेल्या कुऱ्हाडीमुळे माझेही हातपाय या कुऱ्हाडीने असेच तोडले आहेत. हे जर असेच चालू राहिले तर बाबा रे, तुम्हा माणसांना याचे भयंकर परिणाम भोगावे लागतील. दुष्काळ पडेल, नद्यांना पूर येतील. जीवसृष्टी नाहीशी होईल. मानव एवढा बुद्धिमान असून असा कसा वागतो ? हेच मला एक कोडे पडले आहे. तेव्हा जागे व्हा, तुम्ही सगळ्यांनो, ही वृक्षतोड थांबवा. प्रत्येकाने 'मी माझ्या आयुष्यात एक तरी झाड लावेन व ते जगवेन' असा निर्धार करा. तरच तुमच्या पुढच्या पिढीचे जगणे सुसह्य होईल. तुझ्याशी बोलताना मला आज सुंदरलाल बहुगुणांची आठवण येते. वृक्षतोड होऊ नये म्हणून त्याने आपले सर्वस्व पणाला लावले. 'चिपको' आंदोलन सुरू केले. आज या देशाला अशा शेकडो सुंदरलाल बहुगुणांची गरज आहे.

पण आता मी थकलो आहे, जीर्ण झालो आहे. माझे पानन पान गळून गेले आहे. तरीही ऊन-पावसात मी ताठ उभा आहे. आयुष्याशी झगडत, आपलं अस्तित्व टिकविण्यासाठी ! आज तू आलास, मी माझी व माझ्या योगाने साऱ्या निसर्गाची कहाणी तुला ऐकवली. माझं दु:ख तुझ्याजवळ बोलल्याने मला खूप शांत वाटत आहे. माझं फक्त एकच मागणं आहे तुझ्याकडे की, 'तुम्ही जगा व आम्हांलाही जगवा'.

❖❖❖❖❖